RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ५, अंक २(१)] बुधवार, जानेवारी २, २०१९/पौष १२, शके १९४० [पृष्ठे ६, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ३**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १ जानेवारी २०१९.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६.**

क्रमांक परिनि-२०१८/प्र. क्र. ८८/वि. शि.-२.—महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महा. अधि. क्र. ६) याच्या कलम ७२ चे पोट-कलम (१०), तसेच कलम ३१ चा खंड (यत्र) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, कसूरदार संलग्न महाविद्यालये /मान्यताप्राप्त परिसंस्था यांच्यावर लादावयाच्या शास्तीशी संबंधित एकरूप परिनियम विहित करीत आहे :—

**सन २०१९ चे एकरूप परिनियम क्र. १.**

**१. संक्षिप्त नाव.**—या परिनियमास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (कसूरदार संलग्न महाविद्यालये/ मान्यताप्राप्त परिसंस्था यांच्यावर लादावयाची शास्ती) एकरूप परिनियम, २०१८ असे म्हणावे.

**२. शर्तीचा भंग.**—संलग्न महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था किंवा यथास्थिति, त्याचे व्यवस्थापन जर,—

(१) अधिनियमाच्या कलम १०८ च्या पोट-कलमामध्ये विहित केल्यानुसार संलग्नीकरणाच्या/ मान्यतेच्या कोणत्याही शर्तीचा भंग करील ;

(२) विद्यापीठाच्या हिताला बाधा पोहोचेल अशा रीतीने कृती करील आणि/किंवा शैक्षणिक दर्जा यासाठी अहितकारक ठरेल अशी कृती करील ;

(३) पात्रता अर्ज, परीक्षा अर्ज किंवा कोणतेही इतर अर्ज विहित केलेल्या दिनांकानंतर सादर करील ;

(४) परीक्षा पार पाडत असताना शांततापूर्ण आणि योग्य वातावरण राखण्यासाठी यथायोग्य काळजी घेण्यात दुर्लक्ष करील ;

(५) संलग्न महाविद्यालयाच्या किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेच्या परीक्षा केंद्रावर गैरप्रकारांच्या किंवा अनुचित साधनांचा अवलंब करण्याच्या घटना घडतील अशाप्रकारे, तसेच परीक्षा सुरळीत, योग्य व काटेकोरपणे पार पाडण्यासाठी यथायोग्य काळजी घेण्यात दुर्लक्ष करील ;

(६) परीक्षा पार पाडताना प्रत्यक्षरीत्या किंवा अप्रत्यक्षरीत्या गैरप्रकारांना परवानगी देईल किंवा प्रोत्साहन देईल ;

(७) विद्यार्थ्यांकडून अनधिकृत किंवा अधिक फी गोळा करील ;

(८) परिनियम, मानक संहिता किंवा यथास्थिति, त्या त्या वेळी अंमलात असलेले इतर कोणतेही नियम यामधील संबंधित तरतुदींना अनुसरून, विद्यापीठाने दिलेल्या निदेशानुसार, प्राचार्य/ संचालक/ अध्यापक किंवा इतर कर्मचारी यांच्याविरुद्ध यथोचित शिस्तभंगाची कारवाई करण्यात हयगय करील ;

(९) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ६) याच्या संबंधित तरतुदींअन्वये घटित करण्यात आलेल्या, विद्यापीठाच्या तक्रार निवारण कक्षाच्या निर्णयांची यथोचितरीत्या व सत्वरतेने अंमलबजावणी करण्यात किंवा त्यांचे अनुपालन करण्यात हयगय करील ;

(१०) व्यवस्थापन परिषदेच्या मते, संलग्नीकरणाच्या किंवा यथास्थिति, मान्यतेच्या शर्तीचा आणि/ किंवा विद्यापीठाच्या इतर नियमांचा किंवा निदेशांचा किंवा आदेशांचा भंग होईल, असे कोणतेही कृत्य करील तर, त्याच्यावर शिस्तभंगाची कारवाई केली जाण्यास ते पात्र असेल.

**३. शास्ती.—**व्यवस्थापन परिषदेस, खंड २ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही शर्तीचा भंग केल्याच्या कृत्यासाठी जे दोषी आढळून येईल अशा संलग्न महाविद्यालयावर किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेवर किंवा, यथास्थिति, त्याच्या व्यवस्थापनावर शर्तीच्या भंगाच्या कृत्याच्या गांभीर्यानुसार पुढीलपैकी एक किंवा अधिक शास्ती लादता येतील :—

(१) ताकीद देणे / ताशेरे ओढणे ;

(२) दहा हजार रुपयांपेक्षा कमी नाही आणि दहा लाखांपेक्षा अधिक नाही इतका दंड लादणे ;

(३) अनधिकृत तुकडी किंवा त्या त्या शैक्षणिक वर्षाच्या पुढील वर्षासाठीचा पाठ्यक्रम चालू ठेवण्यास प्रतिबंध करणे;

(४) विद्यार्थ्यांना अनधिकृत पाठ्यक्रम पूर्ण करण्यास किंवा परीक्षेकरिता प्रविष्ट होण्यास प्रतिबंध करणे ;

(५) विहित केलेल्या दिनांकानंतर सादर केलेले पात्रता अर्ज, परीक्षा अर्ज किंवा अन्य कोणतेही अर्ज स्वीकारण्यास नकार देणे ;

(६) विनिर्दिष्ट कालावधीकरिता परीक्षा आयोजनाचे केंद्र बंद करणे ;

(७) लगतच्या पुढील वर्षासाठी (वर्षांसाठी) पाठ्यक्रमांची किंवा तुकड्यांची किंवा विद्यार्थ्यांची संख्या ही, त्या शैक्षणिक वर्षासाठी परवानगी दिलेल्या पाठ्यक्रमांच्या किंवा तुकड्यांच्या किंवा अतिरिक्त प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या संख्येहून अधिक असणार नाही इतकी कमी करणे यांसह अतिरिक्त प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकडून आकारलेल्या एकूण शुल्काच्या पाच पटींशी समतुल्य असेल इतक्या रकमेचा दंड लादणे ;

(८) संलग्नीकरणाचे किंवा यथास्थिति, मान्यतेचे निलंबन, आणि पाठ्यक्रमांसाठी विद्यार्थ्यांच्या नवीन प्रवेशाला प्रतिबंध करणे ;

(९) तिस योग्य वाटेल अशी कोणतीही इतर शिक्षात्मक कारवाई करणे.

**४. शास्ती लादण्याची कार्यपद्धती.—**(१) तक्रार प्राप्त झाल्यावर किंवा अधिष्ठाता मंडळाची प्रथमदर्शनी अशी खात्री पटली असेल की, संलग्न महाविद्यालयाने किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेने किंवा यथास्थिति, त्याच्या व्यवस्थापनाने खंड २ मध्ये तरतूद केलेल्या शर्तींपैकी कोणत्याही शर्तीचा भंग केला आहे, तर ते, मंडळ स्वाधिकारे कसूरदार संलग्न महाविद्यालयाच्या किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेच्या व्यवस्थापनास अभिकथित शर्तीचा भंग केल्याबद्दल नोटीस देईल आणि व्यवस्थापनास पंधरा दिवसांच्या आत प्र-कुलगुरुकडे लेखी स्पष्टीकरण सादर करण्यास भाग पाडील. अशा नोटिशीची एक प्रत संलग्न महाविद्यालयाच्या प्राचार्यास किंवा यथास्थिति, मान्यताप्राप्त परिसंस्थेच्या प्रमुखास देखील पाठवण्यात येईल.

(२) जर व्यवस्थापन, ठराविक कालावधीच्या आत लेखी स्पष्टीकरण सादर करण्यास अपयशी ठरले तर किंवा नोटिशीमध्ये नमूद केलेल्या शर्तीचे उल्लंघन करण्याची कृती केल्याचे कबूल करीत असेल तर, कसूरदार संलग्न महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था किंवा, यथास्थिति, त्यांचे व्यवस्थापन यांच्यावर लादण्यात येणाऱ्या शास्तीचे प्रमाण ठरविण्याकरिता अधिष्ठाता मंडळ, आपला अहवाल व्यवस्थापन परिषदेला सादर करील.

(३) जर व्यवस्थापन, नोटिशीमध्ये नमूद केलेल्या शर्तींचे उल्लंघन करण्याची कृती केल्याचे कबूल करीत नसेल तर, व्यवस्थापन परिषद, त्या प्रकरणाची चौकशी करण्याकरिता एक समिती नियुक्त करील.

(४) चौकशी समिती, विद्यापीठाला आणि कसूरदार संलग्न महाविद्यालयाच्या किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेच्या व्यवस्थापनास आपले म्हणणे मांडण्याची व त्यांचे संबंधित दावे तोंडी किंवा लेखी साक्षीपुराव्यासह सादर करण्याची वाजवी संधी देईल. चौकशी समिती, नोटिशीमध्ये नमूद केलेल्या शर्तींच्या भंगाच्या प्रत्येक कृतीबाबतचा आपला निष्कर्ष नोंदवून ठेवील आणि अशा निष्कर्षाची कारणे अभिलिखित करील. चौकशी समिती चौकशी पूर्ण करील आणि तिचा अहवाल ती घटित झाल्याच्या दिवसापासून तीस दिवसांच्या आत व्यवस्थापन परिषदेस सादर करील.

(५) चौकशी समितीच्या निष्कर्षाच्या आधारावर व्यवस्थापन परिषद, तिला योग्य वाटेल त्या प्रमाणे खंड ३ मध्ये विहित केलेली कोणतीही किंवा सर्व शास्ती आणि द्रव्यदंड लादण्याचा निर्णय घेईल.

(६) व्यवस्थापन परिषदेने शास्तीचे प्रमाण ठरविल्यावर अधिष्ठाता मंडळ हे, कसूरदार महाविद्यालयाच्या किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेच्या व्यवस्थापनास, व्यवस्थापन परिषदेमार्फत ठरविण्यात आल्याप्रमाणे आपणावर शास्ती का लादण्यात येऊ नये याची अंतिम कारणे दाखवा नोटीस देईल, आणि पंधरा दिवसांच्या कालावधीच्या आत लेखी स्पष्टीकरण सादर करण्यास व्यवस्थापनास भाग पाडील. लेखी स्पष्टीकरण प्राप्त झाल्यावर किंवा ते प्राप्त झाले नाही तरी, अधिष्ठाता मंडळ व्यवस्थापन परिषदेच्या आगामी बैठकीत नोटीस आणि लेखी स्पष्टीकरण ठेवील, ज्यावरुन, ती कसूरदार महाविद्यालयाच्या किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेच्या व्यवस्थापनाने दर्शविलेल्या कारणाचा विचार केल्यानंतर, लादण्यात येणाऱ्या शास्तीचे प्रमाण ठरवील.

(७) व्यवस्थापन परिषदेने निर्णय घेतल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत अधिष्ठाता मंडळ, कसूरदार महाविद्यालयाच्या किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेच्या व्यवस्थापनास, अशाप्रकारे लादण्यात आलेल्या शास्तीबाबत कळवील.

(८) विद्यापीठाने लादलेल्या शास्तीच्या आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या आत, किंवा विद्यापीठाकडून अनुमती देण्यात आली असेल त्याप्रमाणे अशा आणखी कालावधीच्या आत व्यवस्थापनाने कोणतेही संयुक्तिक कारण न देता त्या आदेशाचे अनुपालन करण्यात कसूर केली असेल तर, व्यवस्थापन,—

(क) पहिल्या कसुरीसाठी प्रत्येक दिवशी पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढी दंडाची रक्कम भरण्यासाठी पात्र असेल ;

(ख) दुसऱ्या आणि त्यानंतरच्या कसुरीसाठी, प्रत्येक दिवशी दहा हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढी दंडाची रक्कम भरण्यासाठी पात्र असेल.

**५. शास्ती लादण्याचे परिणाम.—**या परिनियमाखाली शास्ती लादणे याचा कोणत्याही प्रसंगी कसूरदार महाविद्यालयाने/ मान्यताप्राप्त परिसंस्थेने किंवा, यथास्थिति, त्यांच्या व्यवस्थापनाने केलेली अनियमितता नियमित झाली आहे किंवा माफ करण्यात आली आहे, असा अर्थ ध्वनित होत नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**सिद्धार्थ खरात,**
शासनाचे सहसचिव.

## HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 1st January 2019

*NOTIFICATION*

MAHARASHTRA PUBLIC UNIVERSITIES ACT, 2016.

No. PARINI-2018/C.R.No. 88/VI. SHI. 2.—In exercise of the powers conferred by sub-section (*10*) of section 72 read with clause (*zj*) of section 31 of the Maharashtra Public Universities Act, 2016 (Mah. Act. No. VI of 2017), the Government of Maharashtra hereby, prescribes the Uniform Statute, relating to penalties to be imposed upon erring affiliated colleges/recognised institutions, namely :—

UNIFORM STATUTE No. 1 OF 2019.

1. *Short title.*—This Statute may be called the Maharashtra Public Universities (Penalties to be Imposed upon Erring Affiliated Colleges/Recognised Institutions) Uniform Statute, 2018.

2. *Violation of Conditions.*— An affiliated college or recognised institution or the management thereof, as the case may be, shall be liable for disciplinary action if it,—

(1) violates any of the conditions of affiliation/recognition as prescribed in sub-section of section 108 of the Act ;

(2) acts in a manner prejudicial to the interest of the University and/or acts detrimental to the educational standards ;

(3) submits eligibility forms, examination forms or any other forms beyond the date prescribed ;

(4) neglects to take due care to maintain peaceful and proper atmosphere during the conduct of examinations ;

(5) neglects to exercise due care in the smooth, proper and strict conduct of the examinations, leading to the instances of the mal-practices or adoption of unfair-means at the examination centres of the affiliated college or recognised institution ;

(6) permits or encourages directly or indirectly mal-practices in the conduct of examinations ;

(7) collects unauthorized or higher fees from the students ;

(8) neglects to take appropriate disciplinary action as directed by the University against the Principal/ Director/teachers or other employees as per the relevant provisions in the Statute, Standard Code, or any other rules for the time being in force, as the case may be ;

(9) neglects to implement or comply with the decisions of the Grievances Redressal Cells of the University constituted under the relevant provisions of the Maharashtra Public Universities Act, 2016 (Mah. Act. No. VI of 2017), appropriately and promptly ;

(10) commits any other act which, in the opinion of the Management Council, is an act violating the conditions of affiliation/recognition, as the case may be, and/or other rules or directives or orders of the University.

3. *Penalties.*—The Management Council may impose any one or more of the following penalties upon the affiliated college or recognised institution or the management thereof, as the case may be, which if found guilty of an act of violation of any of the conditions specified in clause 2, commensuration with the gravity of an act of violation of conditions, namely :—

(1) warning/reprimand ;

(2) a fine not less than rupees ten thousand and not exceeding rupees ten lakh ;

(3) prohibition to continue unauthorized division or course beyond the respective academic year ;

(4) prohibiting the students to complete the unauthorized course or to appear for examination ;

(5) denial to accept the eligibility forms, examinations forms or any other forms submitted beyond the prescribed date ;

(6) discontinuation of the centre for conducting the examinations for a specified period ;

(7) a fine of the amount equivalent to five times the total fees charged to the students admitted in excess along with the reduction in the strength in the courses or divisions or students for the subsequent year(s) not more than number of courses or divisions or students admitted in excess of the permitted strength for that academic year;

(8) suspension of affiliation or recognition, as the case may be, and prohibiting new admissions of the students to the courses;

(9) any other punitive action, as it may deem fit.

4. *Procedure to Impose Penalties.*—(1) Upon receipt of a complaint, or *suo motu*, if the Board of Deans is, *prima-facie*, satisfied that the affiliated college or recognised institution or the management thereof, as the case may be, has committed violation of any of the conditions provided in clause 2, it shall issue a notice to the management of the erring affiliated college or recognised institution about alleged act of violating conditions and shall require the management to submit written explanation to the Pro-Vice-Chancellor, within a period of fifteen days. A copy of such notice shall also be sent to the Principal of the affiliated college or Head of the recognised institution, as the case may be ;

(2) In case the management fails to submit the written explanation within the stipulated period or admits the acts of violation of conditions indicated in the notice, the Board of Deans shall submit its report to the Management Council for deciding the quantum of penalties to be imposed upon the erring affiliated college or recognised institution or the management thereof, as the case may be ;

(3) If the management does not admit the acts of violation of conditions indicated in the notice, the Management Council shall appoint a committee to cause an inquiry into the matter ;

(4) The inquiry committee shall offer reasonable opportunity to be heard to the University and to the management of the erring affiliated college or recognised institution to present their respective claims, with oral and documentary evidence. The inquiry committee shall record its findings on each act of violation of conditions indicated in the notice and shall also record the reasons for such findings. The inquiry committee shall complete the inquiry and submit the report to the Management Council, within thirty days from date of its constitution ;

(5) The Management Council on the basis of the findings of the inquiry committee shall decide to impose, any or all of the penalties and fines prescribed in clause 3, as it may deem fit ;

(6) Upon the Management Council deciding the quantum of penalties, the Board of Deans shall issue the management of the erring affiliated college or recognised institution, a final notice to show cause as to why penalty as decided by the Management Council should not be imposed on it and shall require the management to submit the written explanation within a period of fifteen days. On receipt of the written explanation and or in absence thereof, the Board of Deans shall place the notice and the written explanation before the Management Council in its ensuing meeting, which shall, after taking consideration of the cause shown by the management of the erring affiliated college or recognised institution, decide the quantum of penalty to be imposed ;

(7) The Board of Deans shall inform the management of the erring affiliated college or recognised institution, of the penalty so imposed, within fifteen days from the date of decision of the Management Council ;

(8) If the management fails to comply with the order of the University imposing penalty, without any reasonable cause, within the period specified in the order, or within such further period as may be allowed by the University, the management, shall be liable to pay–

(*a*) the fine which may extend to five thousand rupees per day, for the first default ;

(*b*) the fine which may extend to ten thousand rupees per day, for the second and subsequent defaults.

5. *Effect of Imposition of Penalty.*— Imposition of the penalty under this Statute does not imply in any event that the irregularity committed by the erring affiliated college/recognized institution or the management thereof, as the case may be, is regularised or waived.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SIDHARTH KHARAT,

Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD.